MHSO070000872025

**नियमित दिवाणी दावा क्र. ९१/२०२५ मधील निशाणी क्र. २९ वरील आदेश**
**(पारीत दिनांक १८ मार्च २०२६)**

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादींनी त्याच्या दावा मिळकतीच्या वहीवाटीस, नांगरणीस हरकत अडथळा करु नये याकरीता पोलीस बंदोबस्त मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादीनी त्याचे म्हणणे निशाणी क्र.३२ वर दाखल केले आहे. दोन्ही पक्षांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

२. वादीचे थोडक्यात असे कथन आहे की त्याने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी विरुध्द निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. मौजे उपरी, ता.पंढरपूर येथील शेतजमीन गट क्र.२४७/१ पैकी उत्तर बाजुची ५० आर. जमीन हे वादीने दिनांक २५.०४.२०२४ रोजी संजय साहेबराव नागणे यांच्याकडून नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्र.२५३२/२०२४ अन्वये खरेदी केली. त्यानुसार सदर मिळकतीस वादीच्या नावाची नोंद फेरफार क्र.७९३३ अन्वये झालेली आहे. प्रस्तुत दाव्याकामी वादीने प्रतिवादी विरुध्द निशाणी क्र.५ तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज दाखल केला. सदरचा अर्ज गुणावगुणांवर चालुन न्यायालयाने दिनांक २४.११.२०२५ रोजी तो मंजुर केला. त्यानंतर देखील प्रतिवादी हे वादीच्या सदर दावा मिळकतीच्या वहीवाटीस, नांगरणीस हरकत अडथळा करीत आहेत. प्रतिवादी हे दावा मिळकतीच्या वहीवाटीकामी शेतात ये-जा करणारे ट्रॅक्टर चालक व मालक यांना दमदाटी व शिवीगाळ करीत आहेत. वादीने प्रतिवादींना समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला असता ते कोणत्या कोर्टाचा निर्णय मानत नाही असे म्हणुन वादीस त्रास देऊ लागले आहेत. प्रतिवादीच्या गैरकृत्यामुळे वादी हा हतबल झालेला आहे.

३. वादी याने दिनांक ०८.१२.२०२५ रोजी तहसिलदार पंढरपूर यांच्याकडे पोलीस बंदोबस्त मिळण्यासाठी अर्ज दिला असता त्यांनी वादीस तुमचा न्यायालयात

वाद चालु आहे, तुम्ही न्यायालयामार्फत पोलीस बंदोबस्त घ्या असे सांगितले. प्रतिवादीच्या कृत्यामुळे गावातील कोणतेही ट्रॅक्टर मालक हे त्यांचे वाहन वादीच्या दावा मिळकतीत पाठवण्यास नकार देत आहेत. तुर्तातुर्त मनाईचा आदेश असताना देखील प्रतिवादी हे सदर आदेश मानत नाहीत व त्यांनी न्यायालयाच्या आदेशाचे अवमान केला आहे. त्यामुळे वादीने दावा मिळकतीत त्याच्या वहीवाटीस, नांगरणीस प्रतिवादीनी हरकत अडथळा करु नये म्हणुन पोलीस बंदोबस्त मिळण्याची विनंती केली आहे.

**४.** प्रतिवादीनी प्रस्तुत अर्जास विरोध दर्शवुन सदर अर्ज हा खरा व कायदेशिर नाही असे कथन केले आहे. वादीने प्रस्तुतचा अर्ज कोणतेही कारण घडलेले नसताना दाखल केलेला आहे. प्रतिवादी व प्रतिवादी क्र.२ चे वडील ज्ञानु सोपान बागल यांनी आर्थिक अडचणीपोटी दावा मिळकत ही परत देण्याच्या अटीवर तारणस्वरुपी खरेदीखताने संजय नागणे यास दिली मात्र, सदर मिळकतीवर प्रतिवादींचाच कब्जा आहे. संजय नागणे याने मुद्दल व व्याजाची रक्कम मिळूनही दावा मिळकतीचे खरेदीखत हे प्रतिवादींना न देता वादीस बेकायदेशिररीत्या दिली. असे असले तरी दावा मिळकतीवर प्रतिवादींचाच कब्जा वहीवाट आहे. वादीची दावा मिळकतीत कब्जेवहीवाट नाही.

**५.** वादी हा प्रस्तुत खोटया अर्जाद्वारे दावा मिळकतीत कब्जा करण्याच्या प्रयत्नात आहे. प्रतिवादींना आर्थिक अडचण व पाण्याची कमतरता असल्यामुळे फेब्रुवारी २०२४ पासुन दावा मिळकत पडीक आहे. दावा मिळकतीत सध्या कोणतेही पिक नाही. वादी वस्तुस्थिती लपवुन ठेवुन न्यायालयाची दिशाभुल करत आहे. वादी हे तुर्तातुर्त मनाई आदेशाचा गैरफायदा घेऊन प्रतिवादीना सतत त्रास देत आहेत. वादी हे मुळातच नसलेले हक्क प्रस्थापित करण्यासठी, दावा मिळकतीत कब्जा करण्यासाठी व पुरावा तयार करण्यासाठी प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केला आहे. सबब, सदर अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे. प्रतिवादीनी प्रस्तुत अर्जाच्या पृष्ठ्यर्थ निशाणी क्र.३४ सोबत तीन छायाचित्रे अभिलेखावर दाखल केलेली आहेत.

**६.** वादीने प्रस्तुतचा दावा हा त्याने विकत घेतलेली दावा मिळकत यामध्ये प्रतिवादीनी हरकत अडथळा करु नये म्हणुन मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रकरणात तुर्तातुर्त मनाईचा अर्ज मंजुर झालेला असुन प्रतिवादींना दाव्याचा निकाल होईपर्यंत वादीच्या कब्जेवहीवाटीला हरकत अडथळा करु नये अशी ताकीद देण्यात आलेली आहे. असे असताना वादीने प्रस्तुतचा अर्ज त्याची दावा मिळकतीवरील कब्जेवहीवाटीस आणि नांगरणीस प्रतिवादीने हरकत अडथळा करु नये याकामी पोलीस बंदोबस्त मिळावा म्हणुन दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जात वादीने कोठेही त्याला पोलीस बंदोबस्त नेमका कोणत्या घटनेसाठी व किती कालावधीसाठी हवा आहे याचा उल्लेख केलेला नाही. वादी त्याच्या मिळकतीत नांगरणी केव्हा करणार आहे याबाबतचा तपशिल नमुद नाही. प्रस्तुतचा अर्ज जानेवारी महिन्यात दाखल केलेला आहे. सर्वसाधारणपणे जानेवारी महिन्यात शेतीतील पिकांचा हंगाम नसल्याने पिके लावली जात नाहीत. असे असताना वादीने नांगरणीसाठीचा विशिष्ठ कालावधी नमुद केलेला नाही. सबब, या कारणासाठी पोलीस बंदोबस्त देणे संयुक्तिक ठरणार नाही.

**७.** तसेच दावा मिळकतीच्या वहीवाटीस प्रतिवादीनी हरकत अडथळा करु नये म्हणुन पोलीस बंदोबस्त मिळावा अशी वादीने विनंती केली आहे. परंतु, मिळकतीवरील वहीवाट ही सलग असते. त्यासाठी कोणताही विशिष्ठ कालावधी नाही. दावा मिळकत खरेदी केल्यापासुन त्यावर संबंधित मालकाची वहीवाट सुरु होते. खुल्या जागेची वहीवाट हा निरंतर चालणारा विषय असल्याकारणाने त्याकामी पोलीस बंदोबस्त सतत देता येऊ शकत नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादीने केवळ त्याच्या शेतजमीनीच्या वहीवाटीकामी शेतात ये–जा करणारे ट्रॅक्टर वाहन चालक व मालक यांना प्रतिवादीने दमदाटी व शिवीगाळ केल्याचे नमुद केले आहे. प्रत्यक्ष घटना घडल्याचा कोणताही तपशिल अर्जात नमुद नाही. दिनांक ०९.१२.२०२५ रोजी वादीने तहसिलदार यांच्याकडे पोलीस बंदोबस्त मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता. परंतु, या अर्जात देखील घटनेबाबतचा कोणताही तपशिल नमुद केलेला नाही. वादीच्या लाभात तुर्तातुर्त मनाईचा आदेश जरी पारीत केलेला असला तरी त्या आदेशाची

अंमलबजावणी करणेकामी पोलीस बंदोबस्त विशिष्ठ कालावधीसाठी देणे योग्य, संयुक्तिक आणि न्यायोचित आहे. परंतु, असा कोणताही विशिष्ठ कालावधी वादीने त्याच्या अर्जात नमुद केलेला नसल्याने याकामी वादीने मागणी केल्याप्रमाणे पोलीस बंदोबस्त देता येऊ शकत नाही. या कारणास्तव, वादीचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. वरील कारणमिमांसेनुसार खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज (निशाणी क्र. २९) नामंजुर करण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

SONALI SHASHIKANT RAUL

Digitally signed by SONALI SHASHIKANT RAUL
Date: 2026.03.18 17:11:56 +0530

**(एस.एस.राऊळ)**

**दिनांक – १८.०३.२०२६.**

**सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, पंढरपूर,**
**जि. सोलापूर.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | D.S.Landage, Stenographer (Grade-III) |
| Court Name | :- | Jt. Civil Judge (Jr.Dn.) Pandharpur, Dist. Solapur. |
| Date | :- | 18.03.2026. |
| Order signed by the presiding officer on | :- | 18.03.2026. |
| Order uploaded on | :- | 18.03.2026. |